# महिला व बाल विकास आयुक्तालय

२८, राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र:-०२०-२६६०००६३. Email:- mscps.state1@gmail.com

जा. क्र./म.रा.बा.सं.सं/फिरते पथक/ २०२५/ २०२५-२०२६/ ८६४ दि. ५/८/२०२५

प्रति

मा. महासंचालक

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

G.T. हॉस्पिटल समोर,६ वा मजला

नवीन मंत्रालय इमारत,महाराष्ट्र राज्य,

मंत्रालय,मुंबई -३२

विषय: महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयामध्ये रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक" योजना राबविण्याबाबत संस्थांमार्फत जिल्ह्यामधून प्रस्ताव मागवण्याच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.

महोदय

उपरोक्त विषयास अनुसरून महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक" योजना राबविण्याबाबत संस्थांमार्फत जिल्ह्यामधून प्रस्तावाची मागणी करून घेण्याबाबत जाहिरातीचा मसुदा या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, सदरहू जाहिरात महानगरपालिका असलेल्या जिल्ह्यात सर्वाधिक खपाचे वर्तमानपत्रातून (मराठी) प्रसिद्ध करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव | :- | महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, २८ राणीचा बाग,पुणे-१ |
| २. | जाहिरात प्रसिद्धीचा दिनांक | :- | दिनांक ९/८/2025 |
| ३. | बिल कोणाकडे पाठवावे | :- | महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, २८ राणीचा बाग,पुणे-१ |
| ४. | जाहिरातीचे स्वरूप | :- | महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये रस्त्यावरील |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक" योजना राबविण्याबाबत संस्थांमार्फत जिल्ह्यामधून प्रस्तावाची मागविण्याच्या अनुषंगाने जाहिरात |
| ५. | क्षेत्र | :- | महाराष्ट्र राज्य (महानगरपालिका) |
| ६. | किती वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात यावी | :- | राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रसिद्ध होणाऱ्या सर्वाधिक खपाच्या ३ वृत्तपत्रांमध्ये ही जाहिरात प्रसिद्ध करावी. |
| ७. | जाहिरात किती वेळा प्रसिद्ध करावयाची आहे | :- | एकवेळा |
| ८. | प्रस्ताव सादर करावयाचे ठिकाण | :- | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालय |

सोबत:- जाहिरातीचा मसुदा जोडला आहे.

नयना अर्जुन मुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रत:- मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग मंत्रालय,मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास विभाग

महिला व बाल विकास विभागामार्फत रस्त्यावरील मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांचे पूर्नवसन करण्याच्या दृष्टीने सर्वकष योजना म्हणून "फिरते पथक"ही योजना राबविण्यास महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-बालक २०२५/प्र. क्र.०२/का.९ दि. १९/०६/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता २८ महानगरपालिका क्षेत्रांत प्रत्येकी १ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबई शहारासाठी १, मुंबई उपनगर (पूर्व) साठी १ व मुंबई उपनगर (पश्चिम) साठी १ याप्रमाणे एकूण ३१ "फिरते पथक" सुरू करण्यात येणार आहेत.

तदनुषंगाने उपरोक्त ३१ "फिरते पथक" सुरू करणे बाबत दि. १९/०६/२०२५ च्या शासन निर्णयांमध्ये नमूद करण्यात आलेल्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी संस्थानी विहित नमुन्यात तीन प्रति मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज संबंधित जिल्ह्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयामध्ये जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत सादर करावेत. सदर योजनेसंदर्भातील मार्गदर्शक सूचना,अर्ज, अटी शर्ती व इतर माहिती www.maharashtra.gov.in व https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक - ९/८/२०२५
अर्ज सादर करावयाची मुदत दि. २३/८/२०२५ पर्यंत.

नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से.)
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with OKEN Scanner